RCS No. 20-2022

आर. सी. एस. 20/2022
अलका / कार्यकारी अभियंता
CNR NO. MHOS140001852022
निशाणी क्रमांक **17 खाली**

**<u>वादी तर्फे कुलमुखत्यार</u>**

**प्रतिवादी तर्फे उलटतपास श्री. एस. पी. भालेराव यांच्यामार्फत सुरु**

ऊंडेगाव हे उस्मानाबाद आणि अहमदनगर जिल्हयाच्या सिमेलगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ऊंडेगावचा शिवार हा पठाराचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमिनी या मुरुमाड असून विहीर व बोअरवेलच्या संख्या कमी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ऊंडेगावचा शिवार हा ऊंचावरचा असल्यामुळे विहिरींना लवकर पाणी लागत नाही व उन्हाळयामध्ये पाणी आटते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे पिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. ऊंडेगावला माझ्या पत्नीच्या नावे सव्हे्र नंबर ११ /१/क मध्ये शेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सातबाऱ्याच्या इतर हक्क रकान्यात विहिरीची तसेच बोअरवेल किंवा पाईपलाईन यांची नोंद नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, तलाठयाने नोंद घेतली नसेल. तसा मी अर्ज दिला होता, त्याची प्रत मी कोर्टात दाखल केली नाही. तलाठयाने नोंद न घेतल्यामुळे मी ते स्वतः ऑनलाईन केले.

२. हे म्हणणे खरे आहे की, सातबाऱ्यावर ऊसाच्या पिकाची नोंद नाही त्यावर तुर आणि ज्वारी या पिकाची नोंद आहे. ऊस लागवडीची नोंद कारखान्याकडे केली होती, त्यांनी त्याची पावती न दिल्यामुळे ती पावती मी कोर्टात दाखल करु शकत नाही. कारखान्याने पावती न दिल्यामुळे त्याविरुद्ध मी कोठेही तक्रार दाखल केली नाही. हे

म्हणणे खरे नाही की, माझा १ हेक्टर ऊस होता हे मी मोघम सांगतो. ऊसाला खत घातल्याबाबतच्या पावत्या मी दाखल केल्या नाहीत, परंतु त्या पावत्या मी दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे क्षेत्र बरडाचे आहे त्यामुळे त्यावर पोषक अशी पिके येत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, उन्हाळयात पाणी कमी पडत असल्यामुळे पिके जळून जातात. हे म्हणणे खरे नाही की, ऊस हे पीक बारमाही बागायती असल्यामुळे उन्हाळयात पाणी न मिळाल्यामुळे ते जळून जाते. गत वर्षाच्या ऊसाच्या उत्पनाच्या पावत्या मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिएकरी ८० ते ९० टनाचा उतार आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ऊस जळताना मी तेथे हजर नव्हतो. ऊस जळाल्यानंतर जळालेला ऊस हा भैरवनाथ शुगर फॅक्टरी यांनी ९६ टन आणि वैभव गुळउद्योग गोसावीवाडी यांनी ८२ टन ऊस नेला. त्याचे पैसे मला मिळाले.

३. हे म्हणणे खरे नाही की, मागणी केलेली नुकसान भरपाईची रक्कम खोटी स्वरुपाची आहे. कारखान्याचा ऊसाचा भाव रुपये २७५०/– असल्याबाबतचा पुरावा मी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पी. व्ही. सी. पाईप ६० नग जळाल्याचे मी खोटे सांगतो. पी. व्ही. सी. पाईप भुम येथून आणल्याच्या पावत्या मी जोडल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पाईपाची किंमत मी खोटी सांगतो. माझ्या हिश्श्याला १ हे. ३५ आर एवढे क्षेत्र येते परंतु, मी ६ एकर २० गुंठयाचे ठिबक संच विकत आणलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो संपुर्ण संचाची किंमत व तो जळाल्याचे मी खोटे सांगतो. त्याच्या पावत्या मी जोडल्या आहेत.

४. शेतात तारेचे घर्षण होत असल्याबाबतच्या लेखी तक्रारी मी प्रतिवादी यांच्याकडे दिल्या होत्या तसेच तोंडीही वारंवार कल्पना दिलेली होती. परंतु, लेखी तक्रारच्या पावत्या मी कोर्टात दाखल करु शकत नाही. ऊस जळाल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत निरीक्षक, उस्मानाबाद यांना पत्र देवून पंचनामा करुन घेतला. तो पंचनामा कोर्टात दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, निरीक्षकाने घटनास्थळी न येता संगणमताने खोटा पंचनामा लिहून दिला. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२०–२१ मध्ये भैरवनाथ हा एकच कारखाना सुरु होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याकाळी ऊसाचे क्षेत्र जास्त प्रमाणात होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सभासद असल्यामुळे कारखान्याकडे आम्ही ऊस नेण्यासाठी विनंती करीत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, ऊस कारखाना नेत नसल्यामुळे व पाण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे तसेच ऊस जळाल्यानंतर कारखाना तातडीने ऊस घेऊन जातो या कारणासाठी मी ऊस स्वतःहून पेटवून दिला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांच्याकडून पैसे उकळण्यासाठी मी खोटा दावा, शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAJU TUKARAM INGLE

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2024.10.25 11:37:16 +05'30'

दिनांकः–२४.१०.२०२४

**आर. टी. इंगळे**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 24-10-2024 |
| Order signed by the presiding officer on | - | 24-10-2024 |
| Order uploaded on | - | 25-10-2024 |